**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**DIRECT ADMISSION**

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७६ वा | शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कोश्यारींवर संजय राऊत यांचा जोरदार हल्लाबोल

## अशांना पद्मभूषण देणाऱ्यांना बाळासाहेबांनी जोड्याने मारलं असतं

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या वक्तव्यावरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींना घाबरतात, असे विधान कोश्यारी यांनी केल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी त्यांच्यावर तसेच भाजप नेतृत्वावर जोरदार टीका केली आहे. पत्रकारांशी संवाद साधताना राऊत यांनी कोश्यारींच्या विधानाचा खरपूस समाचार घेत, अत्यंत आक्रमक शब्दांत प्रतिक्रिया दिली.

'ज्यांना नीट धोतर नेसता येत नाही ते आम्हाला अक्कल शिकवतात. जे धोतर नीट नेसू शकत नाहीत ते काय ठाकरेंना सांगणार? मोदींना कोण घाबरतंय? डोळ्यात डोळे घालून बोलायची हिंमत नाही मोदींमध्ये,ह्व अशा शब्दांत राऊत यांनी टीका केली. संसदेत गांधींचे भाषण सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र





मोदी आणि अमित शहा यांनी पळ काढला की अनुपस्थित होते, असा आरोप करत त्यांनी भाजप नेतृत्वावर निशाणा साधला.

कोश्यारी यांनी यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यांची आठवण करून देत राऊत म्हणाले, 'छत्रपतींचा आणि महात्मा फुलेंचा अपमान करणाऱ्या व्यक्तीला भाजपने पद्मभूषण दिलं. हा बाळासाहेब ठाकरेंचा विचार नाही. अशांना पद्मभूषण देणाऱ्यांना बाळासाहेबांनी जोड्याने मारलं असतं.' राऊत यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

याच वेळी राऊत यांनी भाजपवर उद्योगपतींना 'खैरात' देत असल्याचा आरोप केला. पिंपरी-चिंचवडमधील १६ एकर जमीन व्यवहाराच्या संदर्भात बोलताना त्यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप केले. 'मेहेरबानीवर हे राज्य चाललं आहे. अदानींवर खैरात, बिल्डरांवर खैरात. पार्थ पवारांचं प्रकरण समोर आलं. या खैरातीवरच सरकार टिकून आहे,' असा आरोप त्यांनी केला.

भाजपला उद्योगपतींकडून मिळणाऱ्या 'रिटर्न गिफ्ट'वर निवडणुका लढवल्या जातात, असा दावा करत राऊत म्हणाले, ह्या खैरातीमुळे भाजपला जो परतावा मिळतो त्यावरच निवडणुका लढवल्या जातात. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये जमिनींच्या व्यवहारांत सरकारची भूमिका संशयास्पद आहे. फडणवीस म्हणतात विश्वास ठेवा, पण ठेवता येत नाही.'

कोश्यारी यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद आता थेट भाजप नेतृत्व आणि उद्धव ठाकरे गटातील संघर्षात परिवर्तित झाला आहे. राऊत यांच्या आक्रमक भाषेमुळे आगामी काळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची तीव्र लढत पाहायला मिळण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, भाजपकडून या आरोपांना काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. कोश्यारींच्या वक्तव्यामुळे सुरू झालेला हा वाद पुढील काही दिवसांत आणखी चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मुख्यमंत्री यांच्याकडे जिल्हा वार्षिक योजनेसाठी 1146.34 कोटीचा आराखडा सादर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन 2026- 27 साठी पालकमंत्री गोरे यांच्याकडून 300 कोटीची अतिरिक्त मागणी, तर पंढरपूर येथे कायमस्वरूपी सुविधा उभारण्यासाठी 65 कोटींची मागणी

जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपायोजना व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्र अंतर्गत 1146.34 कोटीची मागणी सोलापूर जिल्हा प्रशासनाने मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत अतिरिक्त 300 कोटी तर पंढरपूर येथील आषाढी वारीत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी विशेष बाब म्हणून 65 कोटी निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली.

पालकमंत्री श्री गोरे पुढे म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण साठी राज्य शासनाने



ठरवून दिलेली आर्थिक मयार्दा 693.90 कोटी होती, त्यामध्ये 300 कोटींची अतिरिक्त मागणी सह 993.90 कोटी, अनुसूचित जाती उपयोजना 147 कोटी आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र 5 कोटी 44 लाख 54 हजार असा एकूण 1 हजार 146 कोटी 34 लाख 54 हजाराचा आराखडा मंजूर करावा, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी केली.

वर्षा निवासस्थानी येथे आयोजित राज्यस्तरीय नियोजन समिती बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, प्र. जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीमती प्रीतम कुंटला यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्ह्याचा आराखडा मुख्यमंत्री महोदय यांच्यासमोर सादर केला. यामध्ये सर्वसाधारण योजनेमध्ये कृषी व संलग्न सेवा 47.82 कोटी, ग्रामीण क्षेत्राच्या विकास योजना 68 कोटी, जलसंधारण विभाग योजना 48.50 कोटी, ऊर्जा विकास व अपारंपारिक ऊर्जा 65 कोटी, शिक्षण विभाग 40 कोटी, महिला व बाल विकास 19.78 कोटी, आरोग्य सेवांचे बळकटीकरण 73.40 कोटी, नगर विकासाच्या योजना 113 कोटी, रस्ते व परिवहन 67 कोटी, पर्यटन तीर्थक्षेत्र, गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास 47.3 कोटी, पोलीस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण 19.78 कोटी, क्रीडा विभाग 7 कोटी तर अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत कृषी व संलग्न सेवा 7.23 कोटी, ऊर्जा 4.65 कोटी, सामाजिक व सामाजिक सेवा 128.17 कोटी, उद्योग व खाणकाम 34 लाख, नाविन्यपूर्ण योजना 5.28 कोटी, समाज कल्याण कार्यालय बळकटीकरण 73 लाख आणि आदिवासी उपयोजना अंतर्गत 5 कोटी 44 लाख 54 हजाराचा निधी ठेवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# प्रबोधनाचे बादशहा डॉ. प्रा. जे. बी. शिंदे यांचे निधन; पुरोगामी विचारसरणीचा दीपस्तंभ मालवला

**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त) :** प्रख्यात विचारवंत, अभ्यासू लेखक आणि पुरोगामी समाजसुधारक म्हणून ओळख असलेले ह्लप्रबोधनाचे बादशहाह्व डॉ. प्रा. जे. बी. शिंदे यांचे आज वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील प्रबोधनवादी चळवळीचा एक भक्कम आधारस्तंभ हरपला आहे. संत, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांच्या कायार्तून जीवनमूल्ये मांडणारा हा अभ्यासू प्राध्यापक काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी त्यांच्या विचारांचा वारसा दीर्घकाळ समाजाला दिशा देत राहील.



### संतसाहित्य ते सामाजिक चिकित्सा

डॉ. शिंदे यांनी संतसाहित्य, शैक्षणिक आणि सामाजिक विषयांवर सखोल व विश्लेषणात्मक लेखन केले. त्यांच्या लेखनातून संत तुकारामांच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. ह्लतुकारामांची गाथाह्व या पुस्तकातून त्यांनी संत तुकारामांच्या अभंगांचे चिकित्सक विश्लेषण केले. श्रद्धा आणि विवेक यांचा समतोल साधत त्यांनी तुकारामांच्या संदेशातील सामाजिक आशय अधोरेखित केला.

'प्रबोधनातून मूल्यशिक्षण' हा त्यांचा गाजलेला ग्रंथ शैक्षणिक क्षेत्रात विशेष मान्यता पावला. या पुस्तकातून त्यांनी संत, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांच्या कार्याचा आधार घेत विद्यार्थ्यांसाठी जीवनमूल्यांची मांडणी केली. शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून ते सामाजिक जाणीवा जागृत करणारे असावे, हा त्यांचा ठाम आग्रह होता.

### सत्यशोधक दृष्टिकोनाची ठाम भूमिका

डॉ. शिंदे हे सत्यशोधक आणि पुरोगामी विचारांचे प्रखर पुरस्कर्ते होते. अंधश्रद्धा, पंचांग संस्कृतीचे थोतांड, अवैज्ञानिक समजुती आणि परंपरेच्या नावाखाली चालणाऱ्या चुकीच्या प्रथांवर त्यांनी सडेतोड टीका केली. 'पंचांगाचे थोतांड' आणि आयुर्वेदिक उपचारांच्या संदर्भातील त्यांच्या लेखनातून त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन मांडला. समाजाने श्रद्धेपेक्षा विवेकाला प्राधान्य द्यावे, हा संदेश त्यांनी सातत्याने दिला. त्यांच्या लेखनाची शैली परखड, मुद्देसूद आणि चिकित्सक होती. लोकप्रियतेपेक्षा सत्याला महत्त्व देणे, ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका होती. त्यामुळेच ते पुरोगामी विचारसरणीतील एक प्रभावी आवाज ठरले.

### कोल्हापूरच्या वैचारिक विश्वातील वेगळी ओळख

कोल्हापूरसह महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत डॉ. शिंदे यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. विविध व्याख्यानमाला, चर्चासत्रे आणि सामाजिक उपक्रमांतून त्यांनी प्रबोधनाची ज्योत प्रज्वलित ठेवली. विद्यार्थी, अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा मोठा चाहता वर्ग होता. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून शोकसंदेशांचा वर्षाव झाला. 'त्यांचे संपूर्ण आयुष्य समाजजागृतीसाठी वाहिले गेले. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल,' अशा भावना व्यक्त होत आहेत.

डॉ. प्रा. जे. बी. शिंदे यांच्या ऐतिहासिक आणि वैचारिक जीवनकार्याला कोटी कोटी सलाम. प्रबोधनाचा हा दीप मालवला असला, तरी त्याचा प्रकाश समाजमनात कायम तेजोमय राहील.

# श्री दत्त स्वामी समर्थ मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त संगीतमय गुरुचरित्र पारायण सप्ताह

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री महालक्ष्मी सिद्धपीठ मंदिर, राघवेंद्र नगर व राम नारायण चंडक विहार, शिव बसव चौक, सैफुल झ्र सोलापूर येथे औदुंबर कल्पवृक्षाच्या छायेत श्री दत्त स्वामी समर्थ मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त संगीतमय श्री गुरुचरित्र पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया पुरस्कारप्राप्त दत्तगवई संगीतविशारद श्री ज्ञानमाऊली यांच्या सुमधुर वाणीतून श्री दत्तसंप्रदायातील कामधेनु मानल्या जाणाऱ्या ह्यश्री गुरुचरित्रह्ल या दिव्य ग्रंथाचे गायनाधारे पारायण होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

दि. १४ ते २० फेब्रुवारी या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत संगीतमय गुरुचरित्र पारायण होणार आहे. भक्तांसाठी हा सप्ताह अध्यात्मिक अनुभूती






देणारा ठरणार असून सुस्वर दिव्य वाणी व मंगलमय सानिध्यात हा कार्यक्रम पार पडणार आहे.

माघ शुक्ल तृतीया, शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून वैदिक पद्धतीने श्री दत्त स्वामी समर्थ मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व इतर पूजा विधी संपन्न होणार आहेत. अक्कलकोट संचलित श्री प्रसाद पंडित गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वकर्मा मंदिर निर्माण स्थापत्यशास्त्रानुसार हा विधी पार पडणार आहे. पूजा विधीनंतर सर्व भक्तांना महाप्रसादाचा लाभ देण्यात येणार आहे.

या सोहळ्याचे औचित्य साधून शुक्रवार दि. १४ फेब्रुवारीपासून संगीतमय गुरुचरित्र पारायणास सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतील, असा आयोजकांचा विश्वास आहे.

श्री महालक्ष्मी संस्थेच्या वतीने दरवर्षी मंदिर परिसरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये श्री महालक्ष्मी नवरात्र महोत्सव, हनुमान जयंती, दत्त जयंती, विठ्ठल-रुक्मिणी सोहळा, महाशिवरात्री सोहळा तसेच विवेकानंद केंद्राच्या उपक्रमांचा समावेश आहे. हे मंदिर सुमारे शंभर वर्षापूर्वीचे असून अलीकडेच त्याचे (पान 2 वर..)




## संपादकीय

# अपघात, कट की राजकारण? सत्य बाहेर येणार?

अ राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा केवळ अपघात नसून सुनियोजित घातपात असू शकतो, असा गंभीर दावा त्यांचे पुतणे आणि कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. सादर केलेली माहिती, आकडेवारी आणि परिस्थितीजन्य पुरावे यांमुळे या प्रकरणाकडे केवळ दुर्घटना म्हणून पाहणे कठीण झाले आहे.

रोहित पवार यांनी मांडलेल्या मुद्द्यांमध्ये काही गंभीर बाबी आहेत. अपघाताच्या एक मिनिट आधी विमानातील ट्रान्सपॉण्डर बंद होणे, संबंधित विमान कंपनीवर युरोपात उड्डाणबंदी असणे, पायलटच्या क्षमतेबाबत आणि व्यवस्थापनातील बेफिकिरीबाबत उपस्थित केलेले प्रश्न. हे सर्व मुद्दे केवळ राजकीय आरोप म्हणून झटकून टाकता येणार नाहीत. जर यामागे निष्काळजीपणा, नियमभंग किंवा संगनमत असेल, तर तो उघड होणे अत्यावश्यक आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्लअपघाताचे राजकारण करू नकाह्व असे सांगत संयमाचे आवाहन केले. त्यांच्या भूमिकेतील गांभीर्य मान्यच; कोणत्याही दुर्घटनेवर राजकीय पोळी भाजणे हे अयोग्यच. मात्र, त्याच वेळी या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रश्न उपस्थित करणे आणि चौकशीची मागणी करणे हे राजकारण नव्हे, तर लोकशाहीतील मूलभूत हक्क आहे.

सामनाच्या अग्रलेखातून संजय राऊत यांच्याकडून उपस्थित करण्यात आलेले प्रश्नही दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. अपघातापूर्वी ट्रान्सपॉण्डर बंद होणे हा तांत्रिक बिघाड होता की हेतुपुरस्सर कृती? युरोपात बंदी असलेल्या कंपनीला भारतात परवानगी कशी? इतक्या मोठ्या दुर्घटनेनंतर संबंधित कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल झाला नाही? या प्रश्नांची उत्तरे सरकारने पारदर्शकपणे द्यायलाच हवीत.

याप्रकरणी भावनिक वातावरण निर्माण करणे, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडणे किंवा धमकीची भाषा वापरणे हे परिस्थिती अधिक गुंतागुंतीचे करते. ह्लराजकारण करू नकाह्व असे म्हणताना, सत्य बाहेर आणण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत का, हा जनतेचा खरा प्रश्न आहे. जर सर्व काही नियमांनुसार झाले असेल, तर निष्पक्ष चौकशी सरकारलाच दिलासा देईल. पण जर कुठे त्रुटी, संगनमत किंवा दबाव आढळला, तर दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, ते कोणत्याही राजकीय छत्राखाली असोत.

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारणे म्हणजे शत्रुत्व नव्हे; ती जबाबदारी आहे. अजित पवारांसारख्या वरिष्ठ नेत्याच्या मृत्यूचे गूढ कायम राहणे राज्याच्या प्रशासनावरच संशय निर्माण करते. त्यामुळे या प्रकरणाची न्यायालयीन किंवा उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करून सर्व अहवाल सार्वजनिक करणे, हीच सर्वात योग्य दिशा ठरेल.

हा विषय केवळ एका नेत्याच्या मृत्यूपुरता मर्यादित नाही; तो राज्यातील विमानसुरक्षा, प्रशासनिक पारदर्शकता आणि राजकीय प्रामाणिकतेचा कस लावणारा आहे. भावनांवर नव्हे, तर तथ्यांवर आधारित सत्य बाहेर आले पाहिजे. अन्यथा ह्लअपघातह्व आणि ह्लकटह्व यांमधील रेषा कायम धूसरच राहील आणि त्याचा तोटा लोकशाहीलाच सहन करावा लागेल.

पान १ वरून

## श्री दत्त स्वामी समर्थ मूर्ती...

नूतनीकरण करण्यात आले आहे. या नूतनीकरणासाठी राघवेंद्र नगर व राम नारायण चंडक विहार येथील सर्व रहिवाशांचे सहकार्य लाभले आहे.

विशेष योगदान देणाऱ्यांमध्ये श्रीमंत आमणे, सूर्यकांत रंडाळे, मोहन धुमाळ, संजय जाधव, धानया स्वामी, हणमंत मोतीबने, भानुदास सूर्यवंशी, दत्तात्रय व्ही. लाळसंगी, बब्रुवान सावरे, सौ. शिंदे, सौ. वृंदा कुलकर्णी, सौ. अणदूरकर, सौ. कुलकर्णी, शहनवाज काजी, प्रसाद पोतदार, गणपत पुजारी आदींचा समावेश आहे. या पत्रकार परिषदेस भानुदास सूर्यवंशी, हनुमंत मोतीबने, सुरेश बिराजदार, प्रसाद पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संगीतमय गुरुचरित्र पारायण सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सॅमसंग इंडियाकडून गॅलेक्सीe F70e 5G लाँच

### शोस्टॉपर कॅमेरा, अत्यंत आकर्षक डिस्प्ले आणि प्रीमियम लेदर डिझाइन

**दिल्ली (वृत्त सेवा):-** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉ निक्स ब्रँडने आज ऑल-न्यून गॅलेक्सी एफ७० सिरीजमधील पहिला स्मा र्टफोन 'गॅलेक्सीNX F70e 5G'च्या लाँचची घोषणा केली. या नवीन स्मॉर्टफोनमध्ये० तरूण जनरेशन झेड वापरकर्त्यांसाठी अद्वितीय कॅमेरा अनुभव, आकर्षक डिस्लेब आणि प्रीमियम लेदर फिनिश आहे, ज्याममुळे ते दररोज विविध कन्टेकन्टफ तयार करू शकतात, शेअर करू शकतात आणि स्वतःला अभिव्यक्त करू शकतात.

"नवीन गॅलेक्सीe F70e 5G मधून मूल्याकप्रती जागरूक तरूण ग्राहकांना अर्थपूर्ण नाविन्य,तांसह सक्षम करण्यावप्रती सॅमसंगची अविरत कटिबद्धता दिसून येते. आकर्षक पोर्ट्रेट्ससाठी श्रेणीमधील सर्वोत्तम कॅमेरा सेटअप, १२० हट्‌र्झ रिफ्रेश रेट डिस्लेत क आणि प्रीमियम लेदर पॅटर्न फिनिश असलेला गॅलेक्सीe F70e 5G गतीशील जनरेशन झेड ग्राहकांच्या अमर्यादित महत्त्वाकांक्षांची पूर्तता करण्यॉस सज्जल आहे. आम्हाला भारतातील ग्राहकांसाठी हा डिवाईस लाँच करण्या्चा, तसेच स्मा्र्टफोन उद्योगामधील विश्वसनीय ब्रँड म्हहणून सॅमसंगचे स्थाहन अधिक प्रबळ करण्यारचा आनंद होत आहे," असे सॅमसंग इंडियाच्याो एमएक्सय बिझनेसचे संचालक अक्षय एस. राव म्हयणाले.

**दिवसा किंवा रात्री शार्पर पोर्ट्रेट्सचा आनंद घ्या**

गॅलेक्सीं F70e 5G मध्ये उल्लेखनीय कन्टेन्ट निर्माण करण्याची क्षमता असलेली कॅमेरा सिस्टटम आहे. यामध्योि हाय रिझॉल्यूशन ५० मेगापिक्सेल मेन कॅमेरा आहे, जो अधिक सुस्प ष्टपणे व आकर्षक रंगसंगतींमध्ये नयनरम्य दृश्येझ, सूर्यास्तय, स्ट्रीट सीन्सइ आणि संस्मारणीय क्षणांना कॅप्चगर करतो.

मेन कॅमेऱ्यावरील एफ/१.८ अर्पेचर, तसेच सेकंडरी डेप्थस कॅमेरा मुख्यस गोष्टींवर फोकस करत नैसर्गिक बोकेह इफेक्ट निर्माण करतात, तसेच पार्श्वभूमीला अस्पष्ट करत कोणत्याही प्रकाश स्थितींमध्येक आकर्षक पोर्ट्रेट्स कॅप्चआर करता येतात.



# प्रायव्हेट प्रेमाचं पब्लिक मॅटर

**मुलांना प्रेम व्यक्त कसं करावं, हेच समजत नाही,' असं प्रेम करणाऱ्या मुलीचं म्हणणं असेल; तर पंडिता रमाबाई यांचे प्रीतिपत्रिका आणि प्रीतिपात्र 'व्हॅलेंटाइन डे/वीक'च्या निमित्ताने समजून घ्या**

ज्ञानेश महाराव
(ज्येष्ठ पत्रकार)

'प्रेम आंधळं असतं', असं आपण बोलतो; तेव्हा आंधळं प्रेम करणारे डोळस असतात, याकडे आपण जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो. कारण प्रेमात पडणाऱ्याला आपली होणारी फसगत मान्य नसते. जे काही होतं, ते आपसूक होतं, असं बहुतांशांचं म्हणणं असतं. तसं असेल तर, दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी दरम्यान "व्हॅलेंटाइन वीक" का साजरा होतो? आज प्रत्येक गोष्टीचं मार्केटिंग करणारा जमाना आहे. त्यात "व्हॅलेंटाइन वीक"मध्ये तरुणाईच्या लाईफ सिस्टीमला सेव्ह करणारं प्रेमाचं सॉफ्ट्वेअर जोरात आहे. 'सोशल मीडिया'वरील प्रेमळ अकाऊंटची स्टेटस गुलाबी बदामाच्या सिम्बॉलनी आणि प्रेम सूचक शब्दांनी भरलेली आहेत. लव्हलेटरची जागा पोस्टींनी घेतली, तरी मोबाईल फोनची स्क्रीन गुलाबी ठेवण्याची खबरदारी घेतलेली जाते. ह्यातली "मज्जा" ज्याची त्यालाच कळणार! ज्याला ती छळणार, त्याला तो "विदेशी थेरं" म्हणत, "व्हॅलेंटाइन वीक/डे"च्या नावानं बोटं मोडणार!

कारण, हे "व्हॅलेंटाइन" प्रकरण मुळातच विदेशी आहे. इसवी सन तिर्सया शतकात रोममध्ये क्लॉडियस हा क्रूर राजा होऊन गेला. त्याने प्रेमी युगुलांच्या लीलांवर बंदी लादल्याने त्यांचं जीणं मुश्कील झालं होतं. किंग क्लॉडियसच्या मते, अविवाहित पुरुष हे विवाहित पुरुषांच्या तुलनेत अधिक उत्तम असतात. म्हणून त्याने आपल्या सैनिकांना आणि अधिकाऱ्यांना लग्न न करण्याचा आदेश दिला होता. या आदेशाला सेंट व्हॅलेंटाइन यांनी कडाडून विरोध केला होता. त्यांनी अनेक सैनिकांची आणि अधिकाऱ्यांची लग्न लावून दिली. सेंट व्हॅलेंटाइन हे ख्रिस्ती धर्मगुरू होते. त्यांनी प्रेमाचा प्रसार आणि प्रचार केला. पण राजाच्या आदेशाला धुडकावल्यामुळे किंग क्लॉडियसने त्यांना १४ फेब्रुवारी २६९ रोजी फाशीची शिक्षा दिली. तेव्हापासून आपल्या प्रिय आवडत्या व्यक्तीला "व्हॅलेंटाइन" म्हणण्यास सुरुवात झाली. पुढे दरवर्षी १४ फेब्रुवारी हा "व्हॅलेंटाइन डे" नावाने साजरा होऊ लागला. आता त्याचा "व्हॅलेंटाइन वीक" झालाय.

काळानुसार, मोबाइल पोस्ट वा इ-मेलने लव्हलेटरची जागा घेतली आणि भाषा बदलली, तरी त्यातील प्रेमाची भावना बदललेली नाही. कविवर्य मंगेश पाडगावकर सांगत –

प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आमचं सेम असतं!

तसंच, "लव्हलेटर म्हणजे लव्हलेटर असतं," असं सांगणारी संदीप खरे यांची कविता आहे. ती अशी –

लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे,
लव्हलेटर असतं!*
सरळ जाऊन बोलण्यापेक्षा,
इझी आणि बेटर असतं !
गोड गुलाबी थंडीतलं,
गोड गुलाबी स्वेटर असतं!
घुसळ घुसळ घुसळलेल्या,
मनातलं बटर असतं !
लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे,
एक साँग असतं!
ज्यातलं कंटेंट राइट,
आणि ग्रामर राँग असतं !
सुचत नाही तेव्हा,
तुमच्या हार्टमधील पेन असतं!
आणि जेव्हा सुचतं तेव्हा,
नेमकं खिशात पेन नसतं !

कविता मोठी आहे. आपल्या कामाची आणखी काही कडवी वाचा –

लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे,
म्हणजे ड्रीम असतं!
लाइफच्या पेस्ट्रिजवरचं,
स्वीट स्वीट क्रीम असतं !
अर्ध अर्ध प्यावं असं,
शहाळ्यामधलं वॉटर असतं!
तिसऱ्यासाठी नाहीच असं,
अगदी प्रायव्हेट मॅटर असतं!
दोघांपुरतंच बांधलेलं,
'सत्तर एम एम' थिएटर असतं!

ह्या कवितेबरोबर आणखी काही कविता संदीप खरे यांच्या "मोबाइल प"वर उपलब्ध आहेत. पच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचवणारे ते पहिले मराठी कवी आहेत.

प्रेमाबद्दल आजवर खूप काही लिहून- बोलून आणि दगडांवर कोरून- रंगवून झालंय. तरीही खूपजणांना प्रेम कसं व्यक्त करावं, ते कळत नाही. १४ फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाइन डे' आहे. जगभरातील तरुण-तरुणी आपलं मनोगत व्यक्त करणारी कार्ड, पोस्ट, मेसेजेस पाठवतील. एकमेकांना भेट-वस्तू देऊन प्रेम अधिक घट्ट करतील. परंतु, प्रेमाचे असे हाकारे-पुकारे का करावे लागतात? १४४ वर्षांपूर्वी म्हणजे १८८२ मध्ये एका भारतीय स्त्रीने एक पुस्तक लिहिलंय. त्याची 'अर्पणपत्रिका' अशी आहे –

"परलोकवासी प्रियतम भर्ता, बाबू बिपिन बिहारी, एमए, बीएल, यांच्या स्मरणार्थ त्यांच्या शोकाकुल पत्नीने हे लहानसे पुस्तक रचून स्वदेश भगिनीस प्रीतिपूर्वक नजर केले."

वयाच्या २४ व्या वर्षी हे पुस्तक लिहिणाऱ्या या लेखिकेचा पुढे 'पंडिता रमाबाई' असा लौकिक झाला. (जन्म : २२ एप्रिल १८५८ ; मृत्यू : ५ एप्रिल १९२२) त्यांचे माहेरचे आडनाव "डोंगरे" आणि सासरचे "मेधावी". त्यांचे वडील- अनंतशास्त्री हे पौराणिक ग्रंथांचे अभ्यासक आणि गावोगावी भटकंती करून पूजापाठ करणारे ब्राह्मण होते. त्यांचे १८७४ च्या दुष्काळात निधन झाले. त्यांची परंपरा रमाबाई आणि त्यांच्या भावाने सुरू ठेवली. १८७८ मध्ये त्या कोलकात्यात गेल्या. तिथल्या "ब्राह्मो समाज" ह्या हिंदू सुधारणावादी संघटनेत सामील झाल्या. तिथे त्यांच्या ज्ञानाची पावती "पंडिता" आणि "सरस्वती" पदव्यांनी मिळाली. जून १८८० मध्ये त्यांनी हिंदू जातीव्यवस्थेने शूद्र ठरवलेल्या उच्च शिक्षित तरुणाशी विवाह केला. पण त्याचे वर्षभरातच एका मुलीला जन्म देऊन निधन झाले आणि रमाबाई हिंदू विधवेच्या असह्य फेऱ्यात अडकल्या. ह्या अनुभवातूनच त्यांनी "स्त्री-धर्मनीति" हे पुस्तक लिहिले.

गेल्या १०० वर्षांत शहरातली स्त्री खूप बदलली. 'पुढारली' म्हटलं तरी चालेल. परंतु, एकंदरीत भारतीय स्त्री अजूनही पुरातन युगातच आहे. ती तशीच राहावी, ह्याची ताजी साक्ष अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्यावर मिळालीय. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ सुतक काळात घेतली म्हणून त्यांच्यावर वृत्तपत्रांच्या अग्रलेखांतून आणि सोशल मीडियातून हिणकस टिका झाली. त्यामुळे आजही पंडिता रमाबाईंनी "स्त्री-धर्मनीति" पुस्तकात सांगितलेल्या कितीतरी गोष्टी स्त्रियांना मार्गदर्शक ठराव्यात अशा आहेत.

रमाबाईंनी पतीला वश करून घेण्याचे तोडगे भारतीय स्त्रियांना सांगितले आहेत. वशीकरणाच्या वेडाने बुवा- बाबा- बापू- स्वामी यांच्या नादी लागून 'सत्संग-बैठकां'तून आपल्या आयुष्याचं आणि संसाराचं वाटोळं करून घेणाऱ्या स्त्रिया आजही मोठ्या संख्येने दिसतात. यावरून १४४ वर्षांपूर्वी काय परिस्थिती असेल, ह्याचा अंदाज करावा. पतीला वश करण्याचे तोडगे स्त्रीला सांगून झाल्यावर रमाबाईंनी जे म्हटलंय, ते अगदी जीवाचे कान करून ऐकण्यासारखं आणि डोळ्यांत प्राण आणून वाचण्यासारखं आहे. रमाबाई सांगतात, "जगामध्ये सरळ, निःष्कपट व गोड बोलणे आणि मनाप्रमाणे वागणे, हे दोन मनुष्याला (प्रियकर/पतीला) अगदी आपल्या अधीन करून देणारे अद्वितीय वशीकरण मंत्र आहेत. राक्षसी प्रवृत्तीचे लोकसुद्धा या दोन्ही मंत्रांनी भुलून जातात. मग मनुष्याचा तर काय पाड आहे? लोकांपाशी सन्मानित आणि त्यांचे प्रीतिपात्र होणे, हे आपल्या हाती आहे. आपण जसा दुसऱ्याशी व्यवहार करू, तसेच दुसरे आपल्या बरोबर करतील, ही गोष्ट पक्की ध्यानात घेऊन चालले, म्हणजे कोठे अपमान होण्याचा संभव नाही."



पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाईंनी २९ सप्टेंबर १८८३ रोजी आपल्या मुलीसह ख्रिस्ती धमार्चा स्वीकार केला. कर्मठ हिंदूंनी या पंडितेकडे पाठ फिरवली. पुण्यातल्या सनातन्यांनी त्यांना बदनाम केलं. परंतु, त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कायार्ची महात्मा जोतिराव फुले यांनी कायम पाठराखण केली. रमाबाईंनी १५ वर्ष अथक अभ्यास व परिश्रम करून मूळ हिब्रू व ग्रीक ग्रंथांच्या आधारे "बायबल"चं मराठीत रूपांतर केलं. रमाबाईंनी ख्रिस्ती होण्यापूर्वी लिहिलेलं "स्त्री-धर्मनीति" हे पुस्तक आवर्जून वाचा. त्यातून कर्नाटकात जन्मलेल्या या मराठी ब्राह्मण स्त्रीच्या कर्तृत्वाची महाप्रचंड झेप समजेल. त्याचबरोबर स्त्री-पुरुष प्रेम, संसार, सहजीवन म्हणजे काय, तेदेखील कळेल! एकतर्फी प्रेम, अल्पवयीन मुलींचे शोषण, बलात्कार आणि घटस्फोट यांच्या वाढत्या संख्येची कारणं तरी समजतील!!

# सोलापूर-पुणे महामार्गावर भीषण अपघात; चालक जागीच ठार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भरधाव कारने रस्त्याच्या बाजूस असलेल्या लोखंडी कठड्यास धडक देऊन झालेल्या अपघातात कारचालक जागीच ठार झाला आहे. सोलापूर-पुणे महामार्गावर मोडनिंब येथे पहाटे दीडच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. प्रवीण अण्णासाहेब पाटील (वय ४०) शेळगी, सोलापूर असे अपघातात मृत झालेल्या चालकाचे नाव आहे.



पहाटेच्या सुमारास मोडनिंब येथील ओंकार पॅलेस हॉटेलजवळ ही भरधाव क्रेटा कार (एमएच १३ इ एक्स १२९७) लोखंडी कठड्यास धडकली. त्यानंतर कारने तीन-चार वेळा पलटी मारत रस्त्याकडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन आदळली.

यामधील कारचालकाच्या डोक्यात जबरी मार लागून तो जागीच ठार झाला. सर्व दरवाजे लॉक झाल्याने चालक आतच अडकून पडला होता. अपघाताची माहिती कळताच महामार्ग पोलीस व वरवडे टोल प्लाजा येथील ग्रस्तीपथक तातडीने दाखल झाले. कारचे दरवाजे कापून मृतदेह बाहेर काढण्यात आला.

# रक्तदान, क्रीडांगण उद्घाटनासह घुमरे यांचा वाढदिवस उत्साहात

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** विद्या विकास मंडळाचे सचिव विलासरावजी घुमरे यांचा ७१ वा वाढदिवस यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील यशवंत परिवाराच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने रक्तदान शिबिर, क्रीडा मैदानाचे उद्घाटन, व्याख्यान आणि सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात ७१ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. यावेळी विलासराव घुमरे यांच्या हस्ते गोळा फेक मैदानाचे उद्घाटन करण्यात आले. क्रीडांगणातील झाडांचे संरक्षण आणि संपूर्ण मैदानाला कंपाऊंड करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

महाविद्यालयाच्या वतीने विलासराव घुमरे व त्यांच्या पत्नी जयश्रीताई यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, विश्वस्त संभाजी किर्दाक, कोमल घुमरे, कवीवर्य सुरेश शिंदे, उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, प्राचार्य नागेश माने, बारामती अ‍ॅग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, राजेंद्र घाडगे आदी उपस्थित होते.



यावेळी जयवंत आवटे (कुंडल) यांचे विनोदी व सुश्राव्य व्याख्यान झाले. सोशल मीडियाच्या युगात नातेसंबंध कसे दृढ ठेवावेत यावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अभिमन्यू माने यांनी केले व घुमरे सरांचा जीवनपट उलगडून सांगितला.

या प्रसंगी घुमरे यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २५ हजार रुपयांची पुस्तके, महाविद्यालयातील दोन एकर क्षेत्रातील वृक्षसंरक्षणासाठी तारेचे कुंपण आणि स्वच्छ भारत अभियानासाठी ३१ डस्टबीन भेट दिल्या. सूत्रसंचालन प्रा. सुजाता भोरे यांनी केले तर आभार प्रा. विष्णू शिंदे यांनी मानले.

यावेळी घुमरे यांनी आप्तजनांचा गौरव ही पुढील कायार्साठी ऊर्जा देणारी बाब असल्याचे सांगत सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहिताच्या उपक्रमांत पुढेही सक्रिय राहण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर झेडपी अध्यक्षपदासाठी रस्सीखेच

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाजपने यंदा जिल्हा परिषदेवर ३८ हून अधिक जागा जिंकून दणदणीत विजय मिळविला आहे. यंदा जिल्हा परिषद अध्यक्षपद हे ओबीसी खुला प्रवगार्साठी राखीव असून, यात रामप्पा चिवडशेट्टी, दीपक वैद्य, चैताली मुळे, बालाजी नहटे यांच्यापैकी कुणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.




आतापर्यंत अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्याला अध्यक्षपदाची संधी न मिळाल्याने आता रामप्पा चिवडशेट्टी यांना संधी मिळेल यासाठी रस्सीखेच सुरु झाली आहे. रामप्पा चिवडशेट्टी हे आ. सुभाष देशमुख आणि आ. सचिन कल्याणशेट्टी या दोघांशी सलोखा राखून आहेत.

उपळाई ठोंगे (बार्शी) गटातून भाजपाचे दिपक वैद्य विजयी झाले आहेत. तर नात्रज (उत्तर सोलापूर) गटातून भाजपाच्या चैताली मुळे विजयी झाल्या आहेत. पोखरापूर (मोहोळ) गटातून भाजपाचे बालाजी नरुटे हे उमेदवार विजयी झाले आहेत. वळसंग (दक्षिण सोलापूर) गटातून रामप्पा चिवडसेट्टी हे विजयी झाले आहेत. कासेगांव (पंढरपूर) गटातून तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे व्यंकट भालके हे उमेदवार विजयी झाले आहेत. सलगर गटातून माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे चिरंजीव शिवराज म्हेत्रे हे शिंदेसेनेकडून विजयी झाले आहेत. वागदरी (अक्कलकोट) गटातून प्रविण तानवडे हे शिंदेसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत.

सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्षपद यंदा ओबीसी खुला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने यासाठी चांगलीच रस्सीखेच होणार आहे.

**यंदा अध्यक्षपदासाठी अक्कलकोट, दक्षिणचा दावा**

जिल्हा परिषद स्थापनेपासून आतापर्यंत अक्कलकोट, दक्षिण सोलापूरला अध्यक्षपदाची संधी मिळालेली नाही. मागील तीन वषार्पासून जिल्ह्याच्या राजकारणात अक्कलकोट है केंद्रस्थानी राहिले आहेत. त्यामुळे आता अध्यक्षपदावर कुणाची वर्णी लागणार याकडे लक्ष लागून आहे.

**ओबीसीतून यांना मिळाली संधी (कंसात कार्यकाल)**

बाबुराव जाधव (२१ मार्च १९९७ ते २० मार्च १९९८), नारायण खंडागळे (२१ मार्च २००२ ते १७ फेब्रुवारी २००५), वैशाली सातपुते (१८ फेब्रुवारी २००५ ते २० मार्च २००७), डॉ. निशिगंधा माळी कोल्हे (२१ मार्च २०१२ ते २० सप्टेंबर २०१४).

**तालुकानिहाय ओबीसीसाठी आरक्षित गट**

करमाळा केम (महिला) माढा उपळाई त्रु. (महिला), टेंभुर्णी (महिला) बार्शी- उपळाई ठोंगे (खुला), उपळे दमाला (महिला) मोहोळ पोखरापूर (खुला) उत्तर सोलापूर नात्रज (खुला) पंढरपूर - कासेगाव (खुला) माळशिरस - संग्रामनगर (महिला), निमगांव (महिला) सांगोला महूद बु (खुला), एखतपूर (महिला), घेरडी (महिला) मंगळवेढा - संत दामाजीनगर (खुला) दक्षिण सोलापूर कुंभारी (महिला), वळसंग (खुला) अक्कलकोट - सलगर (खुला), वागदरी (खुला).

जिल्ह्यातील १७ गट हे ओबीसीसाठी आरक्षित झाल्याने आता जोरदार रस्सीखेच होणार आहे. यातील धक्कातंत्र वापरून भाजपा अध्यक्षपद कुणाला अध्यक्ष करणार याकडे सर्वांचे लक्ष वेधून आहे.

# सोलापुरात पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीला प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य पोलीस भरती प्रक्रियेअंतर्गत मैदानी चाचणीच्या पहिल्या टप्प्याला बुधवारी (दि. 11) सोलापूर शहर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उत्साहात सुरुवात झाली.

पहाटेपासूनच जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून आलेल्या उमेदवारांनी मैदानावर हजेरी लावली होती.



भरती प्रक्रियेत धावणे, लांब उडी, गोळाफेक आदी शारीरिक चाचण्यांचा समावेश असून संपूर्ण प्रक्रिया कडेकोट पोलीस बंदोबस्तात आणि सीसीटीव्ही देखरेखीखाली पार पाडली जात आहे. उमेदवारांची ओळख पडताळणी, बायोमेट्रिक नोंदणी आणि कागदपत्रांची तपासणी करूनच त्यांना मैदानात प्रवेश देण्यात येत आहे. उमेदवारांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय पथक आणि तात्पुरती विश्रांती व्यवस्था करण्यात आली आहे. उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी चाचण्यांचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने आखण्यात आले आहे.

भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त राखण्यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे. पुढील काही दिवसांत नियोजित वेळापत्रकानुसार उर्वरित उमेदवारांच्या मैदानी चाचण्या पार पडणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली. पोलीस दलात भरती होण्याच्या स्वप्नपूर्तीसाठी युवक-युवतींमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## वात्रटिका

### किड आणि चीड

परीक्षा सुरू आहे तरी
टेन्शन ऐवजी मज्जा आहे...
कॉपीमुक्त परीक्षा धोरण
पण त्याचाही फज्जा आहे...
गुन्हेगारी आणि अशा गोष्टी
जिथे सुरु होतात,ती किड आहे...
महाराष्ट्रातील बिहार, या ओळखीची
त्यांना नाही आम्हाला चीड आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. RNI No. MAHMAR 2006/17624

# मराठा समाजाने संघटित व्हा : मनोज जरांगे यांचे आवाहन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाने आता पुन्हा जागे होऊन संघटित होण्याची गरज असून आज जागे झालो नाही, तर उद्या पश्चाताप करण्याची वेळ येईल, असा इशारा मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी सोलापूर दौऱ्यादरम्यान दिला.

मंगळवेढा येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी जात असताना बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौकात त्यांच्या आगमनानंतर मराठा समाजाच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेवक अमोल शिंदे, गणेश वानकर, प्रियदर्शन साठे, मनोरमा सपाटे, विनोद भोसले, जयकुमार माने, राजन जाधव, रवी मोहिते, ज्ञानेश्वर सपाटे, राम जाधव, प्रा. गणेश देशमुख, किरण पवार यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करून माध्यमांशी संवाद साधताना जरांगे म्हणाले की, आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाज संघटित होणे अत्यंत आवश्यक आहे. ओबीसी समाजाने ५२ टक्के आरक्षणामध्ये आपला वाटा मजबूत केला असून कुणबी समाजाचाही त्यात समावेश झाला आहे.

मात्र उर्वरित आरक्षणामध्ये मराठा समाजाला अपेक्षित संधी मिळाल्या नसल्याने अनेक कुणबी-मराठा कुटुंबांतील विद्यार्थी व युवक वंचित राहत असल्याचा दावा त्यांनी केला.

ओपन जागांवरून निवडून आलेल्या काहींना संधी नाकारण्यात आल्याचा आरोप करत, गोड बोलून मते मागणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. मराठा समाजाने राजकीय प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांवर एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# खुल्या जागी ओबीसी महापौर
# कोंड्यालांच्या निवडीने भाजपमध्ये खदखद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी सर्वसाधारण प्रवर्ग खुला असतानाही भाजपने ओबीसी उमेदवाराला संधी देत राजकीय समीकरणे बदलली आहेत. दोन्ही देशमुख आमदारांनी सुचविलेल्या अनंत जाधव यांचे नाव डावलून अवघ्या ८२ दिवसांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेल्या विनायक कोंड्याल यांची महापौरपदासाठी निवड निश्चित झाल्याने पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे.

महापौर निवडीच्या प्रक्रियेत निष्ठावंत कार्यकर्त्यांना पुन्हा डावलण्यात आल्याची भावना भाजपमध्ये तीव्र झाली आहे. निवडणुकांपासूनच 'निष्ठावंत विरुद्ध आयाराम' असा संघर्ष सुरू होता. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांचा एक गट, तर आमदार विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांचा दुसरा गट असे स्पष्ट विभाजन दिसून आले. अखेरीस पालकमंत्र्यांचा निर्णय अंतिम ठरल्याचे पक्षातील सूत्रांचे म्हणणे आहे.

भाजपकडे ८७ नगरसेवकांचे बहुमत असूनही खुल्या प्रवर्गातील १८ अनुभवी नगरसेवकांना डावलून कोंड्याल यांना संधी देण्यात आली. कोंड्याल यांचा अपक्ष, काँग्रेस आणि शिवसेना असा राजकीय प्रवास असून ते आमदार देवेंद्र कोठे यांचे मेहुणे असल्याने 'घराणेशाही'च्या चर्चा रंगल्या आहेत.

यापूर्वीही महापौरपदाच्या वाटपात नातेवाईकांना संधी दिल्याची चर्चा झाली होती. त्यामुळे 'निष्ठावंतांची माती, आयातांना संधी' अशी टीका कार्यकर्त्यांकडून होत आहे. मराठा समाजातील उमेदवाराला संधी देण्याची देशमुख गटाची मागणी फेटाळण्यात आल्याने नाराजी वाढली आहे.

महापौर व सभागृहनेते पदावर ओबीसींना झुकते माप देत मराठा समाजाची नाराजी दूर करण्यासाठी उपमहापौरपद देण्यात आल्याची चर्चा आहे.

लिंगायत समाजालाही महापौरपदापासून दूर ठेवण्यात आल्याने नगरसेवकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

सोलापूर महापालिकेत एकूण १०२ सदस्य असून त्यात एसटी २, एससी १५, ओबीसी २७ आणि खुल्या प्रवर्गातील ५८ सदस्य आहेत. विविध समाजातील नगरसेवकांमध्ये पद्मशाली १७, लिंगायत १५, मराठा १४, धनगर ११, मुस्लिम ८ आणि ब्राह्मण ३ अशी संख्या आहे.

महापौर निवडीच्या पार्श्वभूमीवर भाजपमधील गटबाजी आणि नाराजी पुन्हा एकदा उघड झाल्याचे चित्र आहे.

# किसन जाधव संपर्क कार्यालयाचे पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते उद्घाटन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक किसन जाधव यांच्या रेल्वे लाईन सोनामाता प्रशाला समोरील संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती लाभली कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय जनसंघाचे सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. दरम्यान ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं ढोल ताशाच्या निनादात फटाक्यांच्या आतिषबाजी करत पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भला मोठा हार घालून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यामुळे अवघा परिसर भाजपमय झाला होता. तर जय श्रीराम जय जय श्रीराम चा नारा घूमल्याने अवघा परिसर भगवामय झाला होता. प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी किसन जाधव व नागेश आण्णा गायकवाड यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून भरीव कामे केल्याचे गौरवोद्गार पालकमंत्री गोरे यांनी काढले. नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रभाग २२ मधील चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याने भाजपची ताकद अधिक बळकट झाल्याचे त्यांनी सांगितले. पुढील काळातही विकासकामांसाठी संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली आमदार देवेंद्र कोठे यांनी किसन जाधव यांचे कार्य लोकाभिमुख व प्रभावी नेतृत्वाचे उदाहरण असल्याचे सांगत, सोलापूर शहर मध्य विधानसभेत 'इच्छा भगवंताची' परिवाराने बजावलेल्या किंगमेकर भूमिकेचा विशेष उल्लेख केला. लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सक्षम नेतृत्व घडल्याचे त्यांनी नमूद केले यावेळी नगरसेवक किसन भाऊ जाधव, माजी नगरसेवक नागेश आण्णा गायकवाड, नगरसेविका चैताली शिवराज गायकवाड, दत्तात्रय मामा नडगिरी, प्रभाग क्रमांक २३ चे नगरसेवक राजशेखर मल्लिकार्जुन पाटील, प्रभाग क्रमांक १६ चे नगरसेविका कल्पना संतोष कदम, अंबादास जाधव, अमोल गायकवाड, विनोद भाऊजी गायकवाड, अँड. किरण गायकवाड, चेतन नागेश अण्णा गायकवाड, उमेश जाधव, शरद शिंदे, निलेश कांबळे, संतोष गायकवाड, अजिंक्य जाधव, कार्तिक जाधव, माऊली जरग, शहाजन शेख, शिवा पाटणकर, तेजस गायकवाड, उत्कर्ष गायकवाड, प्रथमेश पवार, माणिक कांबळे, फिरोज पठाण, वसंत कांबळे, महादेव राठोड, हूलगप्पा शासम, अजिंक्य शिंदे, सचिन राऊत, ऋषी येवले, दिनेश आवटी, नागेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात किसन जाधव यांनी पालकमंत्री गोरे व आमदार कोठे यांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद व सहकार्य अपेक्षित असल्याचे मनोगत व्यक्त केले. दरम्यान सोलापूर महानगरपालिकेचे माजी महापौर श्रीकांचनाताई यन्नम आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या धर्मपत्नी सौ मोनिका वहिनीसाहेब यांनी देखील किसन जाधव यांच्या संपर्क कार्यालयाला भेट देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# तुमच्यासमोर भविष्यातील अनेक स्वप्ने आहेत जीवनात हार मानू नका- मालोजीराजे देशमुख



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** परिस्थितीची जाणीव ठेवून जिद्द, चिकाटी व मेहनत करून अभ्यास करावा.दहावी हा शेवट नसून कॉलेजच्या जीवनात स्वतःला सिद्ध करण्याची तुमची नवीन सुरुवात आहे. एस.एन.डी. स्कूल ने दिलेली मूल्य आणि संस्कार सोबत ठेवा.तुमच्यासमोर भविष्यातील अनेक स्वप्ने आहेत जीवनात कधीही हार मानू नका असे मत एस.एन.डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथील एस.एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या निरोप समारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी ते पुढे बोलत असताना म्हणाले की, आयुष्य खूप चांगले आहे. आनंदात जगा परंतु व्यसनाच्या आहारी जाऊ नका. तुमच्या जीवनात तुम्ही खूप मोठे व्हा. आई-वडिला प्रति प्रेम ठेवा. तुम्ही शिक्षण घेऊन खूप मोठे व्हावे यासारखे आई-वडिलांसाठी दुसरे काही नाही. कॉलेज पूर्ण होईपर्यंत आई-वडील तुम्हाला सांभाळतात आई-वडिलांना चांगले आयुष्य दाखवण्याची नंतरची तुमची जबाबदारी आसल्याचे मत विद्यार्थ्यांपुढे मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त करून दहावी बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा.मुख्याध्यापक प्रवीणकुमार बडवे, महेश शेटे, सेक्रेटरी रोहित शेटे, सहसेक्रेटरी शक्ती पलंगे हे मान्यवर निरोप समारंभासाठी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन दहावी बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे मा. मुख्याध्यापक प्रवीणकुमार बडवे यांनी विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेसाठी व भावी आयुष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे महेश शेटे व विद्यार्थी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक संदीप पानसरे, उपमुख्याध्यापक शकूर पटेल, प्राथमिक विभाग प्रमुख निलम डोंबाळे, पीआरओ मनोज राऊत शिक्षक आदित्य दाभोळे, इरफान शेख, भैय्यासाहेब भागवत, सुदर्शन सुतार, सी.जे.सिजो, ज्योती मोरे, अनुश्री सिझो विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक शकूर पटेल यांनी केले असून आभार व सूत्रसंचालन स्कूलची विद्यार्थिनी सई धालपे हीनी केले.

# स्वारगेट मल्टी हब मेट्रो स्टेशनला दिवंगत अजितदादा पवार यांचे नाव द्या - रोहन सुरवसे पाटील



**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** स्वारगेट येथे उभारण्यात येत असलेल्या मल्टी हब मेट्रो स्टेशनला महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे माजी पालकमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी निवेदन दिले आहे. दरम्यान, हर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, प्रशासकीय पातळीवर योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

सुरवसे यांनी दिलेल्या निवेदनात दिवंगत अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख कायाचा उल्लेख करण्यात आला आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी आणि शहरी विस्तार लक्षात घेऊन आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या दृष्टीने पुणे मेट्रो प्रकल्प साकारण्यात त्यांच्या पुढाकाराची भूमिका महत्त्वाची होती, असे नमूद करण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यता मिळवणे, निधीची उपलब्धता आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधणे या बाबींमध्ये त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे निवेदनात म्हटले आहे.

स्वारगेट हे पुणे शहरातील महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून बसस्थानक, मेट्रो सेवा आणि इतर प्रवासी सुविधांचा एकत्रित संगम येथे होणार आहे. त्यामुळे हे ठिकाण 'मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट हब' म्हणून विकसित होत आहे. अशा महत्त्वाच्या ठिकाणाशी दिवंगत अजितदादा पवार यांचे नाव जोडणे ही त्यांच्या कायार्ला योग्य आदरांजली ठरेल, असे ही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

'कामाचा माणूस' अशी ओळख असलेल्या स्व. पवार यांनी रस्ते, सिंचन, उद्योग, शिक्षण व नागरी प्रकल्पांच्या उभारणीत दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांच्या स्मृती जतन व्हाव्यात, या उद्देशाने स्टेशन नामकरणाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. दरम्यान, या मागणीच्या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

# स्मार्ट किड्स प्री-स्कूल वतीने 'वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ'




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्मार्ट किड्स प्री स्कूल वतीने सोमवार दिनांक 26/01/2026 रोजी सायंकाळी 06.00 वाजता वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ तोगटवीर सांस्कृतिक भवन कन्ना चौक येथे करण्यात आले. या दिमाखदार कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी (चेअरमन, श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतपेढी सोलापूर ), प्रमुख उपस्थिती डॉ. सुवर्णमंदार आचार्य, कार्यक्रमाचे अध्यक्ष संजीवकुमार नंदकिशोर उदगिरी ( माजी अध्यक्ष श्री. तोगटवीर क्षत्रिय युवक संघ सोलापूर ), या मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. तद्नंतर स्नेहसंमेलनात प्लेग्रुप, नर्सरी, एलकेजी, युकेजी विद्यार्थी 1- गणेश सॉंग 2- रिमिक्स गर्ल सॉंग 3- छावा 4- बम बम बोले 5- गलतीसे मिस्टेक 6- रे टू सॉंग 7- स्क्रिप्ट-बिहेवर ऑफ पेरेंट्स विथ हर चाइल्ड 8- टीचर सॉंग या गाण्यांवर सुंदर असे नृत्य सादर करण्यात आले. तसेच प्ले ग्रुप चे युकेजी विद्यार्थ्यांचे फ्रुट कॉम्पिटिशन, ड्रॉइंग कॉम्पिटिशन, व्हेजिटेबल कॉम्पिटिशन, फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन, पोएम्स कॉम्पिटिशन, इ लोकेशन कॉम्पिटिशन, वूमनपेरेंट्स कुकिंग कॉम्पिटिशन, गुड पेरेंट्स अवॉर्ड, न्यूट्रिशन अवॉर्ड, अकॅडमी अवॉर्ड या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. लक्ष्मीकांत उदगिरी यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे मुलांना अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्यात लपलेले सुप्त कलागुणांना वाव मिळत असते. यातून मुलाचे व्यक्तिमत्व सुधारतो तसेच आपल्या पाल्यांना विविध स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रवृत्त करावे असे मनोगत व्यक्त केले. प्रमुख उपस्थिती डॉ. सुवर्णमंदार आचार्य बालसंस्कारांची योग्य पद्धत लालयेत पञ्चवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत

प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं
मित्रवदाचरेत॥
मुलाला पहिली पाच वर्षे
प्रेमाने लाड करावे,
पुढील दहा वर्षे त्याला
शिस्त लावावी (योग्य शिक्षण
व संयम शिकवावा).
लहान वयात मुलाचे
मन प्रेमाने घडते,


आणि पुढील वयात शिस्त व शिक्षणामुळे त्याचा योग्य संस्कार होतो असे मार्गदर्शन केले व सदर प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संजीवकुमार उदगिरी यांनी शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करावे व पुढील शैक्षणिक वषार्साठी शुभेच्छा दिले. सदर प्रसंगी वैष्णवी उदगिरी मॅडम यांनी मान्यवरांचे परिचय करून दिले तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुदर्शन उदगिरी, श्रुती भिमनपल्ली टीचर, पूजा चौधरी टीचर यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीवत्स उदगिरी व मनस्वी उदगिरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्वेता गडेकर टीचर यांनी मानले.




(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**बोअरवेल**
**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क -
शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस
रविवार पेठ, सोलापूर.
9420766666


**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वर-वधू**

**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**पाहिजेत**
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत- गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक- ** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 176

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

# जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 चा मंजूर निधी 31 मार्च 2026 पूर्वी खर्च करावा-पालकमंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन 2026-27 साठी राज्य शासनाने ठरवून दिलेली आर्थिक मर्यादा 693.90 कोटी होती, त्यामध्ये 300 कोटींची अतिरिक्त मागणी सह 993.90 कोटी, अनुसूचित जाती उपयोजना 147 कोटी आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र 5 कोटी 44 लाख 54 हजार असा एकूण 1 हजार 146 कोटी 34 लाख 54 हजाराचा प्रारूप आराखडा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीने मान्य केला. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 चा मंजूर निधी सर्व शासकीय यंत्रणांनी 31 मार्च 2026 पूर्वी खर्च करावा व हा निधी व्यतगत होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री श्री. गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, राजू खरे, समाधान आवताडे, उत्तम जानकर, नारायण पाटील, अभिजीत पाटील





(ऑनलाईन), प्र. जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उप वनसंरक्षक कुलराज सिंग, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला यांच्या सह सर्व संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीने सन 2026-27 चा मंजूर केलेल्या प्रारूप आराखड्या अंतर्गत सर्वसाधारण योजनेमध्ये कृषी व संलग्न सेवा 47.82 कोटी, ग्रामीण क्षेत्राच्या विकास योजना 68 कोटी, जलसंधारण विभाग योजना 48.50 कोटी, ऊर्जा विकास व अपारंपारिक ऊर्जा 65 कोटी, शिक्षण विभाग 40 कोटी, महिला व बाल विकास 19.78 कोटी, आरोग्य सेवांचे बळकटीकरण 73.40 कोटी, नगर विकासाच्या योजना 113 कोटी, रस्ते व परिवहन 67 कोटी, पर्यटन तीर्थक्षेत्र, गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास 47.3 कोटी, पोलीस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण 19.78 कोटी, क्रीडा विभाग 7 कोटी असा निधी ठेवण्यात आलेला आहे.

तर अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत कृषी व संलग्न सेवा 7.23 कोटी, ऊर्जा 4.65 कोटी, सामाजिक व सामाजिक सेवा 128.17 कोटी, उद्योग व खाणकाम 34 लाख, नाविन्यपूर्ण योजना 5.28 कोटी, समाज कल्याण कार्यालय बळकटीकरण 73 लाख आणि आदिवासी उपयोजना अंतर्गत 5 कोटी 44 लाख 54 हजाराचा निधी कृषी, ऊर्जा, सामाजिक सेवा, रस्ते व पूल, नाविन्यपूर्ण योजना साठी ठेवण्यात आलेला आहे.

**बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे-पालकमंत्री**

मागील वर्षी माहे सप्टेंबर ऑक्टोबर या महिन्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे तसेच शेतीचे नुकसान झालेले होते त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी पंचनामे बाबत अनेक तक्रारी मांडल्या त्यावर बोलताना पालकमंत्री श्री गोरे यांनी अतिवृष्टी व पुरामुळे जमीन खरडून गेलेली असल्यास त्या शेतकऱ्यांच्या दोन हेक्टर शेतीचे पंचनामे करण्याबाबत शासनाने निर्देशित केलेले असून प्रशासनाने त्याप्रमाणे पंचनामे करून अहवाल सादर करावेत. पूर व अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही राज्य शासनाची भूमिका असून प्रशासनाने गांभीर्यपूर्वक तक्रारींचे निवारण करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा असे निर्देश त्यांनी दिले.

वीज वितरण कंपनीने शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा होईल यासाठी अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या विजेचे खांब व विजेची लाईन तसेच डीपी याची तात्काळ दुरुस्तीबाबत यापूर्वीच निर्देश दिलेले होते, त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरूपात पालकमंत्री कार्यालय तसेच संबंधित लोकप्रतिनिधी यांना सादर करावा असे निर्देश पालकमंत्री श्री गोरे यांनी दिले. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे वाहने तपासणीसाठी थांबवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत, तरी यामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या वाहनावर या पुढील काळात कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. मंगळवेढा येथील आश्रमशाळेला जिल्हाधिकारी यांनी अचानक भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांना शाळेकडून चांगल्या प्रकारचे जेवण तसेच अन्य सुविधा उपलब्ध केले जात आहेत का याची तपासणी करावी.

यामध्ये कोणीही हलगर्जीपणा करत असेल तर संबंधितावर खडक कारवाई प्रस्तावित करावे असेही पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधी यांच्याकडून विविध मागण्या तसेच सूचना**

आमदार सुभाष देशमुख, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, आमदार देवेंद्र कोठे, आमदार समाधान आवताडे, आमदार नारायण पाटील यांनी नियोजन समितीमध्ये विविध मागण्या, सूचना मांडल्या तसेच त्यांच्या मतदारसंघात विकास कामासाठी निधीची मागणी केली.

यामध्ये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेती पीक व जमिनीचे नुकसान अनुदान मिळणे, खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे व्यवस्थित झालेले नाहीत ते पुन्हा करणे, शाळा दुरुस्तीसाठी निधी मिळणे, सोलापूर शहराला रात्री बारा ते पहाटे पाच या कालावधीत पाणीपुरवठा होत आहे त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याने पाण्याचे नियोजन व्यवस्थित करावे, सोलापूर शहरातील वन विहाराचा विकास पर्यटन केंद्र म्हणून करावा, वीज कंपनीकडून रोहित्र दुरुस्ती तात्काळ करून मिळावी, ग्रामीण भागातील अवैध धंद्यावर पोलिसांनी नियंत्रण ठेवावे, सोलापूर शहरातील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय मान्यता रद्द झाली आहे ते केंद्रीय समितीकडून मिळण्यासाठी महापालिकेने प्रयत्न करावे, जिल्हा परिषदेच्या महापालिका हद्द वाढ भागातील शाळांना निधी मिळावा, सोलापूर शहरातील भुईकोट किल्ल्याचा विकास व संवर्धन नळदुर्ग किल्ल्याप्रमाणे करावा, तांडा वस्ती सुधार योजनेचा निधी मिळवा, कामे दजेर्दार करावीत तसेच आश्रम शाळांची तपासणी करून तेथील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट जेवण मिळाले पाहिजे, करमाळा उपजिल्हा रुग्णालयात सिजेरियनची व्यवस्था करावी व अन्य आरोग्यदृष्ट्या अनुषंगिक सुविधा उपलब्ध करून मिळाल्या पाहिजेत, अशा मागण्या करण्यात आल्या.

प्रारंभी जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे अपघाती निधन झालेले होते, त्यानिमित्त सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी जिल्हा नियोजन बैठकीतील विषयांचे वाचन केले. यामध्ये 1.दि. 16 मे 2025 रोजी झालेल्या समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत व कार्यवाही अहवालास मान्यता. 2. जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत जानेवारी 2026 अखेरच्या खचार्चा आढावा.

3. जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 च्या प्रारूप आराखड्यास मान्यता.

4.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने इतर विषयांवर चर्चा, आदी विषयावर चर्चा करण्यात आली. तर शेवटी बैठकीस उपस्थित मान्यवरांचे आभार सहाय्यक नियोजन अधिकारी प्रीतम कुंटला यांनी मानले.

# सेवाकर्मी कार्यक्रम गुणांकनात सोलापूर जिल्हा परिषद प्रथम
## उत्कृष्ट कामगिरीबद्दल भव्य सत्कार सोहळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सेवाकर्मी कार्यक्रमाच्या गुणांकनामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. सर्व संवर्गाची अद्ययावत व ज्येष्ठता सूची, पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती, सरळ सेवा नियुक्ती, रिक्त पदांची अद्ययावत माहिती, बिंदू नामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया, आय-गोट पोर्टलवर १००% नोंदणी, तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकांचे अद्ययावत करणे आदी सर्व निकषांवर सोलापूर जिल्हा परिषदेने आपली प्रशासकीय गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.कुलदीप जंगम यांचा सर्व महिला कर्मचारी वर्गाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती स्मिता पाटील यांचा सर्व कर्मचारी पुरुष



बांधवांच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

या गौरव सोहळ्यास कुलदीप जंगम (मुख्य कार्यकारी अधिकारी), चंद्रशेखर जगताप (प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), श्रीमती स्मिता पाटील (उपमुख्य कार्यकारी अधिकारी झ्र प्रशासन), श्रीमती मीनाक्षी वाकडे (मुख्य लेखा व वित्त अधिकारी), संतोष कुलकर्णी (कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार सर्व कर्मचारी बांधवांच्या वतीने करण्यात आला.

महाराष्ट्रातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कार्यालयांमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे नाव प्रथम क्रमांकावर झळकल्याने संपूर्ण जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे. या यशामागे प्रशासनातील पारदर्शकता, काटेकोर नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि अधिकारी-कर्मचारी वगार्ची एकजूट हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत.

या यशात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मा. कुलदीप जंगम यांच्या शुभहस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये अविनाश गोडसे, सचिन साळुंखे, हनुमंत गायकवाड, श्रीधर कलशेट्टी, वैशाली रामपुरे, ममता काशेट्टी, नरेंद्र अकेले, महेश केंद्रे, शिवाजी राठोड, अरविंदकुमार सोनवणे, प्रदीप सगट, रामचंद्र गुरव, अर्चना निराळी, अश्विनी मुळीक, विजय पाटील, प्रतीक्षा कांबळे, नरसिंह गायकवाड, मनोज वडगावे, बसवराज भेंडी, जनबसव्वा, कल्याण अक्षय सोनकांबळे, वैशाली शिंदे, शाहू गायकवाड, लक्ष्मी शिंदे, संजय गौडगाव, वीरपक्षया स्वामी, अंजली पेठकर,श्रीदेवी महामुरे, साहेबराव देशमुख, बसवराज स्वामी, विक्रम शहा, रवी करजगी, पद्माकर बनसोडे, लक्ष्मण झिपरे, महेंद्र माने, रेवणसिद्ध म्हेत्रे आदी कर्मचारी बांधवांचा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे-सचिन साळुंखे व सर्व कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले.

तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महताब शेख यांनी केले.

# स्काउट्स गाईड्स, बुलबुल स्पर्धेतही जि.प.कन्या शाळेचा दबदबा



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव भारत स्काउट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय धाराशिव, शिक्षण विभाग जिल्हा परिषद धाराशिव व नरेंद्र आर्य हायस्कूल अपसिंगा, तालुका- तुळजापूर, जिल्हा- धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.9-2-2026 ते 11-2-2026 घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कब बुलबुल / स्काऊट गाईड जिल्हा मेळावा मध्ये जि.प.आदर्श कन्या प्रा.शा.कसबे तडवळे येथील बुलबुल, गाईड पथकातील विद्यार्थिनींनी मेळाव्यात विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये सात बक्षीसे मिळवत नेत्रदिपक कामगिरी केली. त्यामध्ये बुलबुल लोकनृत्य प्रथम क्रमांक, बुलबुल शारीरिक प्रात्यक्षिक प्रथम क्रमांक, लोकनृत्य गाईड द्वितीय क्रमांक, शेकोटी कार्यक्रम बुलबुल द्वितीय क्रमांक, शारिरीक प्रात्यक्षिक गाईड तृतीय क्रमांक, हस्तकौशल्य बुलबुल तृतीय क्रमांक, प्रश्नमंजुषा प्रथम क्रमांक व उत्कृष्ट सहभाग अशी सात बक्षिसे पटाकावली. त्याबद्दल व्यवस्थापन समिती, शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद, जेष्ठ शिक्षक धायगुडे, शाळेतील सर्व शिक्षक यांनी दोन्ही पथकातील विद्यार्थिनी त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गाईड कॅप्टन ताकपिरे शामल, त्यांना सवोतीपरी सहकार्य करणारे शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद, अंश कालिन निदेशक प्रियंका आडसुळ, देशमुख यांचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लाड कमिटी अंतर्गत १४ लोकांना नियुक्ती आदेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महापौर कार्यालयात लाड कमिटी अंतर्गत एकूण १४ लोकांना नियुक्ती आदेशांचे वितरण सोहळा संपन्न झाला. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.महापौर विनायक कोंड्याल यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यक्षम व पारदर्शक प्रशासन देण्यासाठी पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत आहे. लाड कमिटी माध्यमातून पारदर्शक प्रक्रियेने ही निवड करण्यात आली असून, नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी नागरिकाभिमुख सेवा देत आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी ११ बिगारी तर ३ सफाई कामगार यांना आदेश देण्यात आले.या प्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे, गटनेते अमोल बापू शिंदे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे नगरसेवक सिद्धेश्वर कमटम यांच्यासह अन्य मान्यवर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी नियुक्त उमेदवारांना शुभेच्छा देत त्यांच्या पुढील कायार्साठी यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.सदर कार्यक्रमात संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# शंकरनगर-अकलूज येथील महाशिवरात्र यात्रेस प्रारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षी महाशिवरात्र यात्रेचे आयोजन बुधवार दि.११/०२/२०२६ ते सोमवार दि.१६/०२/२०२६ या कालावधीमध्ये केले असून यात्रा व कृषी, औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रमुख उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते बुधवार दि.११/०२/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजता संपन्न झाले.

यावेळी कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

महाशिवरात्र यात्रा, कृषी व औद्योगिक प्रदर्शन, पीक प्रदर्शन व स्पर्धा, दुग्ध स्पर्धा, जनावरांचा बाजार तसेच जंगी कुस्त्यांच्या फडाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाशिवरात्र यात्रेमध्ये कृषी व औद्योगिक स्टॉल, अवजारे, ड्रिप एरिगेशन, ट्रॅक्टर व औजारे तसेच लहान मुलांकरिता खेळणी स्टॉल, विविध पाळणे, अल्पोपाहार व रसपान गृह स्टॉल मोठ्या



प्रमाणात आले आहेत. यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणत रेलचेल होत असून यात्रेकरिता लाखोच्या संख्येने भावीक येतात, त्यांचेकरिता यात्रा कालावधीमध्ये २४ तास पाणी, वीज, पर्यायी रस्ते तसेच आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व त्या सुविधा महाशिवरात्र यात्रा समिती, अकलूज यांचे वतीने उपलब्ध केलेल्या असून त्यासाठी स्वतंत्र यात्रा ऑफिस करण्यात आले आहे.

यात्रेमध्ये शनिवार १४/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. पीक स्पर्धेमध्ये आलेल्या शेती मालाचे परीक्षकांकडून निरिक्षण व निवड तसेच दुपारी ४.०० वा. जातीवंत जनावरांची निवड होणार आहे. रविवार दि.१५/०२/२०२६ रोजी पहाटे ५.३० वा. महाशिवरात्री निमित्त श्री शिवपार्वतीस अभिषेक व महापूजा, सकाळी ६.३० ते ७.०० या वेळेत दुग्ध स्पर्धाचे आयोजन केले असून यात्रेमध्ये होणाऱ्या सर्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वाटप करणेचा कार्यक्रम सदर दिवशी सायं. ५.०० वा. यात्रा ऑफिस समोर होणार आहे.

सोमवार दि.१६/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा. मल्लांच्या जंगी कुस्त्याच्या फडाचे उद्घाटन संपन्न होणार आहे. तसेच रविवार दि.१५/०२/२०२६ रोजी रात्री ८.०० वा. यात्रा व पंचक्रोशीतील रसिक प्रेक्षकांकरिता मंगला बनसोडे लोकनाट्य तमाशा होणार आहे.

अकलूज येथील रूपाली मशिनरी व पाईप्स या दुकानास गुरूवार दि.०५/०२/२०२६ रोजी पहाटे ४ वा. शॉर्ट सर्किट होऊन आग लागली होती, त्यावेळी तातडीने सहकार महर्षि कारखाना कर्मचारी ज्ञानदेव पोळ, चेकींग हवालदार, सत्यजीत चव्हाण, वॉचमन व बाळासाहेब मोरे, वाहन चालक यांनी आग विझविण्यासाठी व आगीत सापडलेल्या कुटूंबाला बाहेर काढण्यासाठी मोलाची मदत केली होती.

त्यांच्या या धाडसी कार्याची नोंद घेऊन त्यांचा सत्कार मानाचा फेटा, शॉल, श्रीफळ, पुष्पहार देऊन विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री व मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील तसेच कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाकरिता कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, रामचंद्र ठवरे, जयदिप एकतपुरे तज्ञ संचालक-प्रकाशराव पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, श्रीकांत बोडके, राजेंद्र भोसले, अनिलराव कोकाटे, सौ. हर्षाली निंबाळकर तसेच जनरल सेक्रेटरी राजेंद्र चौगुले व कारखान्याचे माजी संचालक विजय हेगडे, मोहनराव लोंढे, विविध संस्थेचे पदाधिकारी व कारखान्याचे खातेप्रमुख, अधिकारी, कामगार व नागरीक तसेच सहभागी विविध स्टॉल धारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवर, पदाधिकारी, पत्रकार, अधिकारी, कामगार यांचे आभार सेक्रेटरी अनिल काटे यांनी मानले.

# एपस्टीन फाइल्स, अदानी-अंबानी व पीएम मोदी'
## गांधींच्या आरोपांनी लोकसभेत खळबळ

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** लोकसभेत आज काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणामुळे सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. 'एपस्टीन फाइल्स' अदानी-अंबानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख करत राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. त्यांच्या वक्तव्यांनंतर सत्ताधारी भाजप सदस्यांनी जोरदार आक्षेप घेतला आणि काही काळ कामकाज ठप्प झाले.

राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत असलेल्या 'एपस्टीन फाइल्स'चा उल्लेख करत सरकारवर अप्रत्यक्ष दबाव असल्याचा दावा केला.' अजूनही लाखो कागदपत्रं बंदिस्त आहेत. पंतप्रधानांच्या डोळ्यांत भीती स्पष्ट दिसते. यामागे कारणं आहेत— एक एपस्टीन प्रकरण आणि दुसरं अदानी,' असे ते म्हणाले.

अनिल अंबानी यांच्याबाबत प्रश्न उपस्थित करत राहुल गांधी



म्हणाले, 'अनिल अंबानी नावाचा एक उद्योगपती आहे. तो तुरुंगात का नाही? त्याचे नाव एपस्टीन फाइल्समध्ये आहे. हरदीप पुरी यांची एपस्टीनशी ओळख कोणी करून दिली? मला माहिती आहे आणि त्यांनाही माहिती आहे.' या वक्तव्यानंतर भाजप सदस्यांनी तीव्र निषेध नोंदवला. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि भाजप नेते रविशंकर प्रसाद यांनी राहुल गांधींवर तथ्यहीन आणि दिशाभूल करणारे आरोप केल्याचा आरोप केला. गौतम अदानी यांच्या उद्योगसमूहावर अमेरिकेत सुरू असलेल्या कथित चौकशींचा उल्लेख करत राहुल गांधी म्हणाले की, 'अदानी हे सामान्य उद्योगपती नाहीत. त्यांच्या कंपन्यांवर परदेशात खटले सुरू आहेत आणि त्याचा परिणाम थेट पंतप्रधानांवर होत आहे.' त्यांनी सरकारवर उद्योगपतींशी असलेल्या कथित साटेलोट्याचा आरोप करत पारदर्शकतेची मागणी केली.

राहुल गांधी यांनी परराष्ट्र धोरण आणि व्यापार करारांवरूनही सरकारवर टीका केली. 'अमेरिका आपल्या निर्णयांवर प्रभाव टाकत आहे. शेती क्षेत्र परदेशी कंपन्यांसाठी खुलं करण्यात आलं. शेतकऱ्यांचा विचार केला गेला नाही. देश विकताना लाज वाटत नाही का?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अमेरिकेच्या टॅरिफ वाढीचा संदर्भ देत भारत सरकार दबावाखाली निर्णय घेत असल्याचा आरोप त्यांनी केला.

'कोणताही भारतीय पंतप्रधान दबावाशिवाय असे करार करत नाही. आज जे काही घडलं आहे, ते फक्त पंतप्रधानांचं नव्हे तर १४० कोटी भारतीयांचं सरेंडर आहे,' असा गंभीर दावा त्यांनी केला. दरम्यान, राहुल गांधी यांच्या वक्तव्यांनंतर सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सत्ताधारी सदस्यांनी वक्तव्ये सभागृहाच्या नोंदीतून काढून टाकण्याची मागणी केली. अध्यक्षांनी वारंवार सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. या प्रकरणामुळे संसदेत आणि बाहेरही राजकीय वातावरण तापले असून, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांबाबत अधिकृत कागदपत्रे किंवा पुरावे समोर येणार का, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# 'हा अपघात नाही, घातपातच'; पिंकी माळीच्या वडिलांचा गंभीर आरोप, आ. पवारांच्या प्रश्नांनी प्रकरण तापले

**मुंबई/बारामती (कटूसत्य वृत्त) :-** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी संशयाचे सावट अधिक गडद होत आहे. आमदार रोहित पवार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर आता या अपघातात मृत्यू झालेल्या पिंकी माळी हिचे वडील शिवकुमार माळी यांनीही हा अपघात नसून घातपात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. ह्लमुंबईत सकाळी ६ वाजता कुठे ट्रॅफिक असतं?ह्व असा थेट सवाल करत त्यांनी घटनाक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

बारामती येथे झालेल्या विमान अपघातानंतर सुरुवातीला याकडे अपघात म्हणून पाहिले जात होते.

मात्र रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत अनेक तांत्रिक व प्रशासकीय मुद्दे उपस्थित करत घातपाताची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर बोलताना शिवकुमार माळी यांनीही संशय अधिक बळकट करणारे दावे केले.



'माझी मुलगी पिंकीने चार वेळा अजित पवारांसोबत काळ्या आणि करड्या रंगाच्या विमानातून प्रवास केला होता. मग अपघाताच्या दिवशी अचानक पांढऱ्या रंगाचे वेगळे विमान का देण्यात आले?' असा सवाल त्यांनी केला. तसेच अपघाताच्या दिवशी केवळ पायलटच नव्हे, तर विमानही बदलण्यात आल्याची माहिती समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले.

नियोजित पायलट ऐनवेळी बदलण्यात आल्याच्या चर्चावर प्रतिक्रिया देताना शिवकुमार माळी म्हणाले, 'सकाळी ६ वाजता मुंबईत कोणत्या भागात इतका ट्रॅफिक असतो की पायलट बदलावा लागतो? हा योगायोग आहे की नियोजनबद्ध हालचाल?' त्यांनी रोहित पवार यांनी मांडलेले मुद्दे योग्य असल्याचे सांगत, 'आम्हालाही हा घातपात असल्याचा संशय आहे,'असे स्पष्ट केले.

दरम्यान, रोहित पवार यांनी उपस्थित केलेले प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत :

दौरा, विमानाची वेळ आणि पायलट ऐनवेळी का बदलण्यात आला?

केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाच्या अहवालातील वेळा आणि एटीसी ट्रान्सस्क्रिप्टमधील वेळांमध्ये विसंगती का आहे?

दृश्यमानता कमी असल्याचे सांगितले जात असताना लँडिंगचा निर्णय का घेण्यात आला?

विमानाचा आवाज वेगळा का येत होता? ट्रान्सपॉन्डर बंद होता की तो बंद करण्यात आला?

पायलट सुमित कपूर यांचा पूर्व इतिहास संशयास्पद असल्याची माहिती खरी आहे का?

पायलटवर कोणाचा दबाव होता का?

आपत्कालीन परिस्थितीत मुख्य पायलट गप्प का होता?

हा अपघात नव्हे तर जाणीवपूर्वक विमान क्रॅश करण्याचा प्रकार होता का?

फॉरेन्सिक पथक घटनास्थळी उशिरा का पोहोचले?

या प्रश्नांमुळे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. विरोधी पक्षांनी स्वतंत्र, निष्पक्ष आणि बहुआयामी चौकशीची मागणी केली आहे.

केंद्र सरकार आणि नागरी उड्डाण मंत्रालयाने चौकशी समिती नेमली असल्याचे सांगितले असले, तरी आरोप-प्रत्यारोपांमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

अजित पवार यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्याच्या मृत्यूने राज्यभर हळहळ व्यक्त होत असताना, त्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, हे उघड होण्याची सर्वसामान्य नागरिकांना अपेक्षा आहे.

चौकशी अहवालातून सत्य बाहेर येणार का, आणि घातपाताच्या आरोपांमध्ये तथ्य आहे का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.